**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ६३ दिनांक २६/०८/२०२३**

# राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वरील होणारे गंभीर व प्राणांतीक अपघाताचे प्रमाण कमी करण्याकरीता NHAI (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण) यांचेसोबतचे बैठकीबाबत.

दि.२५/०८/२०२३ रोजी सकाळी १२.०० वा. पोलीस अधीक्षक कार्यालयात मा. पोलीस अधीक्षक सो यांचे दालनात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर होणाऱ्या प्राणांतीक तसेच गंभीर स्वरुपाच्या होणाऱ्या अपघाताच्या संदर्भात श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांचे मार्गदर्शनाखाली NHAI (राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण) यांचे प्रकल्प संचालक श्री. सुहास चिटणीस, प्रबंधक श्री. सुमीत कुमार, रोड कॉन्ट्रॅक्टर, रोड सेफ्टी ऑडीटर, रोड स्ट्रक्चर तसेच महामार्गावर असलेले तलासरी पोलीस ठाणेचे पोनि/विजय मुदडक, कासा पोलीस ठाणेच प्रभारी अधिकारी पोनि/नामदेव बंडगर, मनोर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी श्री. सतिश शिवरकर, जिल्हा वाहतुक शाखा प्रभारी अधिकारी सपोनि/असिफ बेग, महामार्ग सुरक्षा पोलीस पथक, मनोर पोउपनि/राजेंद्र ठाकुर, महामार्ग सुरक्षा पोलीस पथक, चारोटी पोउपनि/इर्शाद सय्यद यांच्या उपस्थितीमध्ये पालघर जिल्ह्यात मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग ४८ वर होणाऱ्या गंभीर स्वरुपाच्या अपघाताच्या संदर्भात अपघाताची कारणे व उपाययोजना यासंदर्भात सखोल चर्चा करण्यात आली. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना मा. पोलीस अधिक्षक सो यांनी खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत.

- **राष्ट्रीय महामार्ग ४८ वर सर्व ठिकाणी दिशादर्शक बोर्ड, वेगमर्यादा बोर्ड, अपघात प्रवण क्षेत्र बोर्ड तात्काळ लावणे.**
- **खानीवडे टोलनाका ते आच्छाड चेकपोस्ट दरम्यान रस्त्यावर पडलेले खड्डे तात्काळ बुजवून घेणे जेणेकरून अपघाताचे प्रमाण कमी होईल.**
- **खानीवडे टोलनाका ते आच्छाड चेकपोस्ट दरम्यान असलेले ब्रिजवर लाईट, रम्बलर स्ट्रिप्स, दिशादर्शक बोर्ड, स्पिड लिमीट बोर्ड यांची उपाययोजना तात्काळ करणे.**
- **रस्त्याचे दुभाजक यांची उंची वाढवणे जेणेकरून एका वाहिनीवरील वाहन दुसऱ्या वाहिणीवर जाऊन गंभीर स्वरूपाचा अपघात होऊ नये.**
- **राष्ट्रीय महामार्गावर बंद पडलेल्या लाईटची दुरुस्ती करून तात्काळ लाईट चालू करण्यात यावी.**
- **राष्ट्रीय महामार्गावर अत्याधुनीक अशा क्रेन, ॲम्ब्युलन्स, हायवे पेट्रालींग व्हेइकल तात्काळ तैनात करण्यात यावी.**

- **राष्ट्रीय महामार्गावर ज्याठिकाणी अनावश्यक रोड कट आहेत ते तात्काळ बंद करून घेण व त्याठिकाणी सुरक्षा रक्षक जाळी बसविणे.**
- **महामार्गावर ज्याठिकाणी कट आहेत त्याठिकाणी स्टोरेज लाईन करणे.**
- **राष्ट्रीय महामार्गावर भरधाव वेगाने वाहणे चालविल्यामुळे गंभीर अपघात होतात त्यामुळे महामार्गावर अत्याधुनीक उच्च प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे.**
- **अपघात प्रवण क्षेत्रावर रम्बलर स्ट्रिप्स, कॅटआईज, ब्लींकर लाईट महामार्गावर तात्काळ बसविणे.**
- **जव्हार फाटा, मनोर याठिकाणी वारंवार गंभीर स्वरूपाचे अपघात होऊन जीवीतहानी होत असते. तरी सदर ठिकाणी तात्काळ सर्विस रोड तयार करून जव्हार फाटा क्रॉसिंग कट तात्काळ बंद करणेबात सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत.**

तरी पालघर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग ४८ हा एकुण ८६ कि.मी. लांबीचा असून सदर राष्ट्रीय महामार्गावर अपघात कमी करून जीवीतहानी कमी करण्याच्या अनुषंगाने वरील सर्वांशी सखोल चर्चा करून त्याची अंमलबजावणी तात्काळ करणेबाबत श्री बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी सक्त सुचना दिलेल्या आहेत. तसेच क्रेन, ॲम्ब्युलन्स, पेट्रोलींग वाहन, रस्त्यावर पडलेले खड्डे व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी व गंभीर स्वरुपाचे होणारे अपघात यांचे प्रमाण कमी करण्याच्या अनुषंगाने सदर बैठकिचे आयोजन करण्यात आले होते.